PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chintoo-2
Year: 2013

Song: Aai Shapath Deva Shapath
Lyricist: Sandeep Khare

आई शपथ देवा शपथ
गोष्टी अगदी खऱ्या
आई शपथ देवा शपथ
गोष्टी अगदी खऱ्या
उंच उंच डोंगर आणि
खोल खोल दऱ्या
जंगलामध्ये चालता चालता
लागते आहे धाप
जंगलामध्ये चालता चालता
लागते आहे धाप
अवती भोवती हिरवे काळे
लोंबकळणारे साप
करवंदाच्या जाळीमागे
पडले आहे कोणी
बुरखा घालून कबरी मागे
दडले आहे कोणी
हा हा हा हा हसतो मांत्रीक
ढवळत बसतो आमटी
आमटीमध्ये शंभर हडं
अन् तरसाची कवटी

वाकडे तिकडे धावत सुटले
चिंचोळे भुयार
हवेलीच्या खालून गेले
जंगलामध्ये पार
पाण्यामध्ये जहाज त्याचा
गंजून झाला चूरा
अडकलेल्या सांगाड्याच्या
हाती अजून सूरा
पारंब्याचे चाबूक घेऊन
राखण करतो वड
गरगर डोळे फिरवत
बसले ढब्बाले घुबड
पारंब्याचे चाबूक घेऊन
राखण करतो वड
गरगर डोळे फिरवत
बसले ढब्बाले घुबड
एका खाली एक अशा
खोल विहीरी आठ
दडून बसली त्याच्या खाली
रहस्याची वाट

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*